www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 245 वा मंगळवार दि. 20 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# कोपरच्या पारंपारिक स्मशानभूमीवर तोडक कारवाई केल्यास जन आंदोलनाचा ईशारा

## प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी आता रस्त्यावरची लढाई लढणार- लोकनेते रामशेठ ठाकूर





**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

सिडकोने कोपर गावातील पारंपारिक स्मशानभूमीवर तोडक कारवाईची टांगती तलवार आणली आहे. मात्र ही केवळ कोपर ग्रामस्थांच्या स्मशानभूमीची समस्या राहिली नसून सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. सिडको वारंवार भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांवर अन्याय करीत आहे हे खपवून घेतले जाणार नाही. लोकनेते दिबासाहेबांनी कणखर भूमिका घेऊन प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवले. त्यामुळे आता प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडवण्यासाठी रस्त्यावरची लढाई लढावीच लागेल, असा आक्रमक पवित्रा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतला.

पनवेल तालुक्यातील कोपर (गव्हाण) येथील शेकडो वर्षांपूर्वीच्या पारंपारिक स्मशानभूमीवर सिडको तोडक कारवाई करणार असल्याचे समजताच या कारवाईला विरोध करण्यासाठी सोमवारी (दि. १९ मे) सकाळी कोपरसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकवटले. यावेळी कारवाईला कडाडून विरोध करताना लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. यावेळी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी सिडकोसमवेत बैठक लावण्यासंदर्भात उलवे पोलिस ठाण्यावर पायी मोर्चा काढून निवेदनही देण्यात आले. तसेच उरणचे आमदार महेश बालदी आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या असहकार्याच्या भूमिकेबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. स्मशानभूमी बाबत ठोस उपाययोजना न केल्यास सिडको, पोलीस स्टेशन, तहसीलदार कार्यालय व वेळप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरही ठिय्या मांडू असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी सिडकोविरोधात घोषणा देत स्मशानभूमीच्या कारवाईला आणि स्थलांतरित जागेला तीव्र विरोध दर्शविला. याप्रसंगी पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जितेंद्र म्हात्रे, भार्गव ठाकूर, सचिन घरत, रत्नप्रभा घरत, विजय घरत, किशोर पाटील, वामन म्हात्रे, मनोज घरत, साईचरण म्हात्रे, वैभव घरत यांच्यासह कोपर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, कोपरची स्मशानभूमी सिडकोने २००६ साली बांधली. २०२० साली स्मशानभूमी भोवती कंपाउंड वॉल बांधण्यासाठी सिडकोने टेंडर काढले आणि आता सिडको स्मशानभूमीवर तोडक कारवाई करू पाहते. त्यामुळे सिडको वारंवार भूमिका बदलत असून प्रकल्पग्रस्तांबाबत दुटप्पी धोरण लादत आहे. येथील वसाहतींना स्मशानभूमीचा त्रास होत असल्याचे सांगत सिडको स्मशानभूमीवर कारवाई करणार असल्याचे सांगते. मात्र याठिकाणी वसाहती नंतर उभ्या राहिल्या असून स्थानिक भूमिपुत्र-प्रकल्पग्रस्तांची स्मशानभूमी परंपरागत अस्तित्वात आहे हे ध्यानात ठेवावे. येथून स्मशानभूमी हटवल्यास गोरगरीब, वयोवृद्ध नागरिकांना अंत्यविधीसाठी अनेक अडचणींचा सामोरे जावे लागेल याची सिडकोला बिलकुल जाण नाही.

ते पुढे म्हणाले, सिडकोने ९५ गावांची जमीन संपादित केली. मात्र अद्यापही या सर्व गावांच्या स्मशानभूमींचा प्रश्न सोडवलेला नाही. त्यामुळे नवीन स्मशानभूमी बांधताना गावातील पारंपारिक जुन्या स्मशानभूमींवर कारवाई करून चालणार नाही. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदर्श सरकार कार्यरत आहे. त्यामुळे सिडकोने नागरिकांवर अन्याय करू नये. प्रकल्पग्रस्तांच्या या समस्येबाबत आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर या दोघांनीही जातीने लक्ष घालावे, अशीही सूचना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली.

प्रकल्पग्रस्तांवरील अन्याय विरोधात सिडकोविरोधात लढाई पुकारल्यास कल्याण, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त देखील सामिल होतील. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल. आपल्याला आपले हक्क भांडूनच मिळवावे लागतील. सुरुवातीला यासाठी पनवेल व उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त व ग्रामस्थांची मजबूत संघटना गठीत करण्यात येईल. कोपरच्या स्मशानभूमीतून या जनआंदोलनाची ही केवळ ठिणगी पेटली आहे. मात्र प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवायचे असतील तर खऱ्या अर्थाने पेटून उठावे लागेल, असे आवाहनही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी केले.

यावेळी ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे म्हणाले कि, प्रकल्पग्रस्तांची ही लढाई लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लढणार आहोत. सिडकोचा उलवे नोड अत्यंत संवेदनशील असून सिडको कोणाच्याही घरावर कारवाई करते, स्थानिकांना सोयीसुविधा देत नाही. त्यामुळे याविरोधात आपली एकजूट महत्वाची आहे. स्मशानभूमीची जमीन वेटलँड क्षेत्रात येत असल्याचे सिडकोचे म्हणणे आहे. परंतु या स्मशानभूमीलगतच्या वेटलँड भूखंडांवर टोलेजंग वसाहती उभ्या राहिल्या आहेत हे सिडकोला दिसत नाही का? या विरोधात आम्ही नक्कीच आंदोलन छेडू. सिडको प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेत नाही, तर हुकूमशाही पद्धतीने कारवाई करते. या हुकूमशाही विरोधात आपण एकजुटीने उभे राहून विरोध करून सडेतोड उत्तर देऊया, असे आवाहनही जे. एम. म्हात्रे यांनी केले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी सरपंच रत्नप्रभाताई घरत आदींनीही मनोगत व्यक्त केले.



# दारूमुक्त खारघरसाठी निर्धार




**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

खारघर शहर दारूमुक्त व्हावे, यासाठी सहयोग सेवाभावी संस्था आणि खारघरमधील नागरिकांच्या वतीने जनआंदोलन उभारण्यात आले आहे. या आंदोलनाच्या अंतर्गत रविवारी खारघरमध्ये सांकेतिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला आणि दारूमुक्त खारघरसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

राज्य शासनाने खारघर शहर दारूमुक्त घोषित करावे, यासाठी संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. २००७ पासून मोर्चे, आंदोलने आणि शासनाकडे पत्रव्यवहार समितीने केले आहेत. याच मागणीसाठी १८ मे रोजी खारघरमधील शिल्प चौकात एकदिवसीय सांकेतिक उपोषण आयोजित करण्यात आले होते, ज्याला खारघरवासियांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खारघर शहराला दारूमुक्त करण्याची मागणी येथील नागरिक मागील दोन दशकांपासून करत आहेत. मात्र, उत्पादन शुल्क विभाग लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून दारू विक्रीचे परवाने वाटप करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, ॲड. नरेश ठाकूर, कीर्ती नवघरे, वासुदेव पाटील, समीर कदम, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अमर उपाध्याय, यांच्यासह पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल येथे साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, उद्योजक राजू गुप्ते, क्रिकेट प्रशिक्षक अमित जाधव, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रशांत कर्पे उपस्थित होते.**

**(छायाचित्र दैनिक युवक आधार )**

# वादळी वाऱ्यामुळे सोलर पॅनल नुकसान

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजितसिह. ठाकुर.**



रिसोड तालुक्यातील रिठद येथील शेतकरी सौ.कांताबाई हनुमान बोरकर यांच्या गट नंबर १०१ मधील शेतातील सोलर पॅनल व मोटर पंप GK कंपनीचा बसवलेला असून दि.१५ मे २०२५ रोजी दु.३.०० वा.सोसाट्याच्या वारा व मेघगर्जनेसह तुफान पाऊस झाल्याने पैकी सोलर पॅनल चे नुकसान झाले आहे. त्यामध्ये १४ प्लेट (पाटी) पैकी १० प्लेट चे(पाटी) नुकसान झाले आहे.तरी सोलर कंपनीने याबाबत दखल घेऊन शेकऱ्यांना प्लेट (पाट्या)बदलून देऊन सहकार्य करावे हि शेतकऱ्यांने अपेक्षा व्यक्त केली.

# मानवी आरोग्यास घातक असलेला गांजा विक्री करणाऱ्या महिलेकडुन

## 04 किलो 579 ग्रॅम गांजा जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग प्रमुखः -राजू शिंदे.**

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे मा. पोलीस अधीक्षक साहेबांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे व्यक्तीची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक 16/05/2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती मिळाली की, चंदनझिरा येथे महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक रा. लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना हि तिच्या राहत्या घरामध्ये मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजाची अवैधपणे स्वतः चे आर्थीक फायद्यासाठी विक्री करत असल्याची माहिती मिळाली, मिळाले बातमीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना येथे महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक, वय 30, रा.लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर, चंदनझिरा जालना हिच्या घरी छापा मारुन तिच्या ताब्यातुन एकुण 4 किलो 579 ग्रॅम वजनाचा गांजा रु.91,580/- किंमतीचा माल जप्त केला असुन सदर महिलेविरुध्द चंदनझिरा पोलीस ठाणे जालना येथे एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना श्री. अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, सहा. पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खाडे, रस्तुम जैवाळ, प्रशांत लोखंडे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, रमेश काळे, भागवत खरात, धीरज भोसले, सचिन राऊत, गणेश वाघ मपोअ कविता काकस, सत्यभामा उबाळे सर्व स्थागुशा यांनी केली आहे.





## गाडीला बनावट नंबर प्लेट लावून केली फसवणूक

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर** : चार चाकी गाडीला बनावट रजिस्ट्रेशन प्लेट लावून शासनाची फसवणूक केली तसेच वाहन पेट्रोल इंधनावर असताना सीएनजी किट बसवून वाहनात फेर बदल केल्याप्रकरणी जयेश काळूराम भगत यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीतील कळंबोली गाव तलावाजवळील शर्मा बेकरी या ठिकाणी चार चाकी वाहनावर बनावट नंबर प्लेट लावण्यात आली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वाहनाची चौकशी केली असता काळ्या रंगाची होंडा एकॉर्ड वाहन पार्क केलेले मिळून आले. यावेळी त्यांनी त्यांचे नाव जयेश भगत (कळंबोली) असे सांगितले. गाडीची मूळ कागदपत्र विचारले असता त्यांनी असमर्थता दर्शवली. त्यानंतर इ चलन मशीनवर वाहन क्रमांक टाकून माहिती घेतली असता सदरचा रजिस्ट्रेशन क्रमांक हा दुचाकी वाहनाचा असल्याची माहिती मिळाली तसेच वाहन पेट्रोलवर असताना मागील डीकीमध्ये सीएनजी सिलेंडर बसवले होते. बनावट प्लेट लावून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

=================================

## 70 हजारांचा मोबाईल चोरला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**

पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या सॅक बॅगमधून 70 हजार रुपये किमतीचा आयफोन चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सायली बाळाराम म्हात्रे या आसुडगाव येथे राहत असून त्या पटेल ज्वेलर्स येथे नोकरी करतात. 17 मे रोजी त्यांनी आयफोन सॅक बॅगमध्ये ठेवला होता. पनवेल एसटी स्टँड येथून पायी चालत गुणे हॉस्पिटलच्या जवळील भाजी मार्केटच्या रोडवर बसलेल्या महिलेकडून त्यांनी करवंदे घेतली. त्यावेळी पैसे काढून त्या महिलेला दिले आणि बॅगची चैन लावली. त्यावेळी त्यांचा मोबाईल फोन बॅगेत होता. त्यानंतर त्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, कर्मवीर भाऊराव पाटील चौक येथून पायी चालत जात पटेल ज्वेलर्स येथे आल्या आणि बॅगेत ठेवलेला मोबाईल घेण्यासाठी गेल्या असता बॅगची चैन उघडी होती. आणि बॅगेत मोबाईल नव्हता. चोरट्याने मोबाईल चोरून नेला.

=================================

## मोटरसायकल पार्क करून हळदीला गेले अन चोराने मोटरसायकल पळवली

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मोटरसायकल पार्क करून हळदीच्या कार्यक्रमासाठी गेले आणि चोराने मोटरसायकल पळून नेल्याची घटना तोंडरे येथे घडली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अजय सोंडकर हे धरणा कॅम्प येथे राहत असून त्यांनी होंडा सीबी शाईन ही मोटरसायकल मित्राची तोंडरे येथे हळद असल्याने दुर्गा माता मंदिरा शेजारील मोकळ्या शेतात पार्क केली. रात्री साडेअकराच्या सुमारास ते पार्क केलेल्या मोटरसायकलच्या जवळ आले असता मोटरसायकल दिसून आली नाही. आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला मात्र मोटरसायकल सापडली नाही.

## तंबाखू व गुटखा सोडण्यासाठी सर्वोत्तम पर्याय आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर**

कॅन्सर सारख्या आजारापासून दूर राहण्यासाठी आजच तंबाखू सोडा आणि हे प्रॉडक्ट चालू करा तंबाखू सोडण्याची खुप ईच्छा आहे पण सुटत नाही अशा लोकांसाठी उपयुक्त महाराष्ट्र मध्ये प्रथमच, आयुर्वेदिक तंबाखू तंबाखू व गुटखा सोडण्यासाठी आयुर्वेदिक औषधी हानिकारक नाही कोणताही साईड इफेक्ट होत नाही , तोंडातील लाळ चे प्रमाण वाढते, आणि आरोग्यासाठी लाळ वाढणे हे खूप चांगल असते चुन्याची आणि मळण्याची गरजच नाही तंबाखू गुटखा खाण्याची इच्छा झाली की खाणे थुंकी पोटात जरी गेली तरीही आरोग्यदायी आहे चार चौघात बसलो असेल तर थुंकण्यासाठी उठून जाण्याची गरज नाही ह्याची सवय लागत नाही.




# अवकाळी पावसामुळे ऊस पिकाला जीवदान

**दैनिक युवक आधार**

**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरुरआनंतपाळ** : अवकाळी पावसामुळे ऊस पिकासह भाजीपाला पिकांना जीवदान मिळाले आहे. शनीवारी सायंकाळी पाच वाजता मेघगर्जेनेसह येरोळ व परिसरात पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे ऊस, फप्पई, केळी उत्पादक शेतकरी व भाजीपाला उत्पादक शेतकर्‌यांना दिलासा मिळाला. या वर्षी पाऊस कमी झाल्यामुळे विहिरींनी तळ गाठला असून, पिकांना पाणी कसे द्यायचे असा प्रश्न पडला होता, असे येरोळ येथील शेतकऱ्यांनी सांगितले. यावर्षी जून महिन्यापासून सप्टेंबरअखेरपर्यंत पाऊस तुलनेने कमी पडला होता. अचानक पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतातील सखल भागात पाणी साचले होते. पाणी साचल्यामुळे शेताला दुचाकीवर गेलेल्या शेतकर्‌यांना चिखलमय रस्त्यातून वाहन चालवतांना मोठी कसरत करावी लागली.



## पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 9 जून ला विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांचा होणार सत्कार

**दैनिक युवक आधार**

**भंडारा वार्ताहर**

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व दैनिक माझा मराठवाडा विदर्भ विभागीय संपादक संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 9 जून 2025 ला दुपारी 3 वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सामाजिक क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांचा सत्कार पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ निसर्गरम्य या ठिकाणी करण्यात येणार आहे . सत्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह ,सन्मानपत्र ,पुष्पगुच्छ असेल.करिता सामाजिक, शैक्षणिक, कला क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांनी 25 मे 2025 पर्यंत पत्रकार संजीव भांबोरे यांचा मोबाईल क्रमांक 70 66370489 माहिती करिता संपर्क साधावा.




## ट्रक अपघातात दोन गंभीर चालकाचे नियंत्रण सुटल्याने घडला अपघात

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**

**गजानन पवार पाटील.**

**रिसोड** - चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक दुभाजकावर आदळल्याने घडलेल्या अपघातात दोन गंभीर जखमी झाले. सदर घटना रिसोड ते सेनगाव मार्गावरील निजामपूर फाटा येथे 17. मे रोजी सायंकाळी घडली. असून यामध्ये एकाची प्रकृती चिंताजनक आहे. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. प्राप्त माहितीनुसार.. सेनगाव कडून रिसोड कडे येणाऱ्या mh.37.t.3075. क्रमांकाच्या ट्रकने निजामपूर फाटा येथे प्रथम विद्युत खांबाला धडक देऊन दुभाजकावर आदळल्याने भीषण अपघात झाला. सदर अपघातामध्ये. मंगेश कडूजी तिरके.वय 32.वर्ष. विक्रम दिलीपराव देशमुख. वय 35.वर्ष.दोघे रा. वाकद. ता. रिसोड हे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती कळताच परिसरातील नागरिकांनी जखमींना रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचाराकरिता भरती केले. डॉक्टरांनी प्रथम उपचार करून जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी वाशीम येथील शासकीय रुग्णालयात पाठविले. सदर अपघात एवढा भीषण होता की अशोक लेलँड या वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.




## रेवदंडा ड्रोनने प्री-वेडिंग शूट; जिल्हाधिकाऱ्यांच्या मनाई आदेशाचा भंग ; एकावर गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार

निलेश फुंडे रेवदंडा

रेवदंडा परिसरातील साळाव पुलावर ड्रोनद्वारे प्री-वेडिंग शूट केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जिल्हाधिकारी रायगड यांचा ड्रोनविषयी मनाई आदेश असतानाही त्याचे उल्लंघन करण्यात आल्याने ही कारवाई करण्यात आली. ही घटना 17 मे 2025 रोजी सकाळी 7.30 वाजता घडली. कुलदीप गजेंद्र उपाध्याय (वय 25, रा. पुष्कराज अपार्टमेंट, गांधीचौक, बदलापूर, जि. ठाणे) यांनी रेवदंडा साळाव पुल आणि समुद्र किनाऱ्याचा भाग लग्नाच्या शूटिंगसाठी ड्रोनद्वारे चित्रीत केला. मात्र यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी न घेतल्याने आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन झाल्याने रेवदंडा पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.पोलिस शिपाई जितेंद्र रामचंद्र मगर यांनी यासंदर्भात रेवदंडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भा.दं.वि. कलम 223(ब) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



रेवदंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी स.पो. नि. श्रीकांत किरविले यांनी सांगितले की, “सागरी किनारा भाग सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट मनाई आदेश जारी केले असून, त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.”रेवदंडा आणि साळाव परिसर हे निसर्ग सौंदर्याने नटलेले असून, अनेक फोटोग्राफर या ठिकाणी प्री-वेडिंग शूटसाठी आकर्षित होतात. मात्र सध्याच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर ड्रोनच्या वापरावर बंदी आहे. नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि कोणतीही परवानगी न घेता ड्रोन वापरणे टाळावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे

# कोणी न्याय देतं का न्याय... !

## दिव्यांग शाळा अधीक्षक समान वेतनश्रेणी पासून वंचित..? अजब अधिकाऱ्यांची गजब भूमिका ?

**विभागीय प्रतिनिधी..**

**उमेश पाटील जळगाव.**

दिव्यांगाच्या कल्यानार्थ समाज सेवि संस्थान मार्फत दिव्यांगाच्या विशेष निवासी शाळा, निवासी कर्मशाळा कार्यरत आहेत. यात दिव्यांग मुलांची वसतिगृहावर सर्व प्रकारची अत्यंत महत्वाची जबाबदारी हि वसतिगृह अधीक्षक / गृहपाल यांची असते यात 24 तास त्यांना शाळा स्तरावर मुख्यालयी हजर राहणे व आपल्या सामान्य मुलांपेक्षा या विशेष मुलांची काळजी घ्यावी लागते. असे करित असतांना या वसतिगृह अधीक्षक व गृहपाल यांनी शासनाकडे जेव्हा आम्ही विशेष पदवीका धारक आहोत तसेच आम्हच्या जबाबदारी चा कालावधी व जोखीम याच शाळेत कार्यरत विशेष शिक्षकांच्या तुलनेत जास्त असल्याने विशेष शिक्षकांना मिळणाऱ्या वेतन श्रेणीनुसार वेतन मिळावे याची मागणी होऊ लागली. अनेक वेळा दिव्यांग कल्याण, आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत वसतिगृह अधीक्षक व गृहपाल या पदाची वेतन श्रेणी सुधारणा करणे योग्य आहे असे मत व्यक्त करण्यात आले आहे. परंतु वेळोवेळी पाठविलेल्या अहवाल त्रोतक स्वरूपाचे असल्याने परिपूर्ण प्रस्ताव वेतन त्रुटी निवारन समिती 2024 अन्वये गठीत समितीने पाठवावा असे दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानव्ये सादर करावयाच्या पत्रात नमूद केले. सदर अहवाल पाठविण्यास दिरंगाई चीं परिसिमा ओलांडून झाल्यानंतर पण अहवाल शासनास प्राप्त होतं नसल्याने वेळोवेळी शासन स्तरावरून एकूण 12 स्मरण पत्र आयुक्त दिव्यांग कल्याण पुणे यांना या प्रकरणी देण्यात आल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थिती मध्ये या कार्यरत वसतिगृह अधीक्षक व गृहपाल यांनी आपल्याला न्याय मिळावा व त्रुटी निवारण समितीचा अहवाल तात्काळ शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा याकरिता मा. राज्यमंत्री ऍड. आशिष जयस्वाल यांच्याकडे मागणी धरून लावली त्यांनी पण या विषयावर सतत पाठपुरवठा केल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांनां दप्ततर दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही व्हावी या करिता मा. मुख्यसचिव महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिले. तसेच या प्रकरणी श्रीमती संगीता डावखरे सहाय्यक आयुक्त तथा अतिरिक्त कार्यभार उपायुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालंय पुणे यांनी मिळालेल्या अतिरिक्त कार्यभार चे सोने करत तसेच गठीत त्रुटी निवारण समिती अध्यक्ष असल्या कारणाने कोणत्याही समिती सदस्यांचे मत विचारात न घेता व अहवालावर स्वाक्षरी न घेता आपली मनमानी करत अहवाल आयुक्त दिव्यांग कल्याण यांची साथ घेत शासनाकडे पाठविला. हा अहवाल पाठवितांनी सामान्य मुलांच्या विविध विभागाच्या वसतिगृहावर काम करणाऱ्या अधीक्षकांपेक्षा दिव्यांग शाळेतील अधीक्षकांची जबाबदारी कामे कमी आहेत असे स्पष्टीकरण करून अहवाल असकारात्मक पाठविला. मग काय? खरंच दिव्यांग शाळेतील वसतिगृहावर कार्यरत अधीक्षक व गृहपाल यांच्या जबाबदारी कमी? असा प्रश्न पडला... कदाचित श्रीमती डावखरं वेगळ्या विचारांनी ग्रस्त असेल त्यामुळे दिव्यांग मुलांची तुलना सामान्य मुलांप्रमाणे केली.? सामान्य मुले अनेक कार्य स्वतः करतात तर दिव्यांग मुलांना हे करता येत नाही.. यावर जास्त सांगायचे झाले तर ज्या घरात दिव्यांग मुलं जन्माला येते त्या घरात किती मुलांचा सांभाळ करण्याच्या अडचणी येतात हे जावे त्यांच्या वंसा तेव्हाच कळे...! यावरून समजविणे चुकीचे होणार नाही. मुळात जर दिव्यांग शाळाची आवश्यकता नसती तर एवढ्या कमी शाळांकरिता स्वतंत्र दिव्यांग कल्याण आयुक्तालंय वं त्यात श्रीमती डावखर यांच्या सारख्या अधिकारी यांना पण शिक्षण विभागात जेवढ्या शाळा आहेत तेवढ्या शाळा दिव्यांग कल्याण ला नसल्यामुळे यांची राज्यस्तरावर जबाबदारी कमी आहे. त्यामुळे यांचा बेसिक इतर सहाय्यक आयुक्त च्या तुलनेत कमी व्हावा हे उचित होईल अशी दिव्यांग शाळा वसतिगृह अधीक्षक व कार्यरत गृहपाल यांची धारणा आहे. राज्य शासनाने दिव्यांग कल्याण विभाग वेगळं करून काहीही तिर मारलेला नसून या विभागाची प्रगती व विस्तारिकरणं करण्यात अशाच लालची वं सूडबुद्धीने काम करणाऱ्या लोकांमुळे राज्यात खालच्या स्तराला नेवून ठेवलेले आहे. या विभागाला स्वतंत्र मंत्री वं राज्यमंत्री पण नाही अनेक वर्षांपासून या विभागाला मुख्यमंत्री महोदय स्वतःकडे ठेवतात या विभागाला न्याय देण्यासाठी वं अडचण दूर करण्याच्या दृष्टीने सतत पत्रव्यवहार हा कचऱ्याच्या ढीगाऱ्यात पडलेला दिसतो... मग न्याय कसे मिळणार.

## आरोग्य संजीवनी..

संकलन, विभागीय प्रतिनिधी जळगाव उमेश पाटील जांभळाच्या सिझनमध्ये जांभळे खाण्याचे अनेक फायदे *यामध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे, हृदयाचे आरोग्य सुधारणे, पचन सुधारणे, रोगप्रतिकार शक्ती वाढवणे, आणि वजन कमी करणे यांचा समावेश आहे. जांभळांमध्ये व्हिटॅमिन सी, लोह आणि अँटिऑक्सिडंट्स असतात, जे आरोग्यासाठी खूप फायद्याचे असतात. जांभळाचे फायदेः रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करतेः जांभळांमध्ये असलेले गुणधर्म रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी हे फायदेशीर आहे. ***हृदयाचे आरोग्य सुधारतेः*** जांभळांमध्ये अँथोसायनिन्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. हे रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करतात आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. ***पचन सुधारतेः*** जांभळांमध्ये असलेले फायबर पचन सुधारण्यास मदत करते आणि बद्धकोष्ठता दूर करण्यास मदत करते. **रोगप्रतिकार शक्ती वाढवतेः** जांभळांमध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्स रोगप्रतिकार शक्ती वाढवतात. वजन कमी करण्यास मदत करतेः जांभळात कमी कॅलरीज असतात आणि जास्त फायबर असल्याने ते वजन कमी करण्यास मदत करते. ***त्वचेसाठी फायदेशीरः*** जांभूळ त्वचेतील कोलेजन वाढवते, ज्यामुळे त्वचा चमकदार आणि निरोगी राहते. ***डोकेदुखी कमी करतेः*** जांभूळ खाल्ल्याने डोकेदुखी कमी होते, असे अभ्यासातून दिसून आले आहे. ***रक्त शुद्ध करतेः*** जांभळातील लोह आणि व्हिटॅमिन सी रक्त शुद्ध करण्यास मदत करतात. ***जांभळाच्या पानांचे फायदेः*** मधुमेहासाठीः जांभळाच्या पानांचा रस मधुमेहासाठी फायदेशीर असतो, कारण ते रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. **पचन सुधारते** जांभळाच्या पानांचा चहा पचन सुधारण्यास मदत करतो. ***जांभळाच्या बियांचे फायदेः*** **रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करतेः** जांभळाच्या बियांची पावडर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते, त्यामुळे मधुमेहासाठी हे फायदेशीर आहे. ***वजन कमी करण्यास मदत करते*:** जांभळाच्या बियांची पावडर वजन कमी करण्यास मदत करते, असे अभ्यासात दिसून आले आहे.

**उमेश पाटील जळगाव**

## जिल्हाधिकारी यांची नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रास सरप्राइज भेट कामकाजाची केली पाहणी, आरोग्य सेवेबाबत केल्या सूचना





**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर**

प्राथमिक आरोग्य केंद्रांला सोमवार 19 मे रोजी दुपारी 12.00 वाजण्याच्या सुमारास रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. पाहणी दरम्यान या केंद्रात येणाऱ्या रुग्णांना तातडीच्या आरोग्य सेवा देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या.यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाट,आरोग्य सहाय्यक राजेंद्र पवार, भरत क मारकड,औषध निर्माण अधिकारी श्रीम. अपर्णा साजेकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

या भेटीच्या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रुग्णालयाच्या कामकाजाची पाहणी केली. तसेच दररोज किती रुग्णांची तपासणी केली जाते, किती रुग्णांना संदर्भाकित केले जाते, त्याची कारणे योग्य आहेत किंवा नाहीत याची पाहणीही केली. या शिवाय काही रुग्णांशी संवादही साधला. दरम्यान, ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने आरोग्य सेवा मिळण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून काम करण्याच्या सूचना दिल्या, विनाकारण रुग्णांना संदर्भाकित करू नये त्यांच्यावर आरोग्य केंद्र स्तरावर उपचार करावेत. तसेच रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना योग्य वागणुक द्यावी. एकही रुग्ण उपचाराविना परत जाऊ नये याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी दिल्या.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटार सायकलस्वार ठार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

एका अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटार सायकल स्वार गंभीर जखमी होवून मयत झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. ओमकार शिंत्रे (22 रा.कोपरखैरणे) हे बुलेट मोटार सायकलवरुन आपल्या घरी जात असताना कुंडेवहाळ येथे आलेवेळी कंटेनरने ब्रेक मारल्याने त्यांनी त्यांच्या ताब्यातील बलुटचा ब्रेक मारल्याने मोटार सायकल स्लीप होवून ओमकार शिंत्रे व त्याचा मित्र खाली पडले असता पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने अविचाराने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून त्याच्या वाहनाचे चाक मयत ओमकार शिंत्रे याच्या तोंडावरुन जावून त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबतचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सपोनि सुनील वाघ करीत आहेत.

# पाणीटंचाईत विहिरीचा आधार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

सिडकोकडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होत असताना कठीण काळात खारघर गावातील विहिरींची मोठी मदत होत असल्यामुळे ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. या विहिरींचा कपडे धुण्यासाठी व बाहेरच्या वापरासाठी उपयोग केला जात आहे.

खारघर परिसरात आजही अनेक भागात पाणीटंचाईची समस्या असून पुरेसे पाणी मिळत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. सिडकोकडून नवीन आणि मोठ्या व्यासाच्या जलवाहिनी जोडणीचे काम वेगात सुरू असून लवकरच पाणीसमस्या दूर होणार असल्याचे आश्वासन सिडकोकडून दिले जात आहे. दरम्यान, खारघरमधील ग्रामस्थांना वर्षानुवर्षे पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीला आजही मुबलक पाणी आहे. गावातील कौलारू घरांचे इमारतीत रूपांतर झाले असून भाडेकरूंचे प्रमाण अधिक आहे. गावात, इमारतीत थेट जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा होत असल्यामुळे विहिरीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते; मात्र गेल्या काही दिवसांपासून सिडकोकडून पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे खारघर गावातील ग्रामस्थ
आणि भाडेकरू विहिरीतील पाण्याचा उपयोग कपडे आणि भांडी धुण्यासाठी करीत आहेत. कठीण काळात विहिरींची आधार मिळाल्यामुळे ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.

गावात नळाद्वारे थेट घरात पाणी पोहोचल्यामुळे विहिरीकडे पाठ फिरवली होती; मात्र खारघर गावातील ग्रामस्थांनी विहीर ही गावाची ओळख असून गावाला अनेक वर्षे साथ दिल्यामुळे या विहिरीतील पाणी दूषित होऊ नये म्हणून विहिरीच्या सभोवती संरक्षणासाठी लोखंडी जाळी टाकण्यात आली आहे. विहिरीत मुबलक पाणी असल्यामुळे कपडे धुण्यासाठी दिवसभर गर्दी असते.
3

# कोस्टल मदत कक्षाच्या जनजागृतीसाठी दुचाकी रॅली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

खारघरमधील रहिवाशांना कोस्टल हेल्पलाइन नंबर १०९३ माहिती व्हावा, यासाठी खारघर पोलिस ठाण्याच्या वतीने काढण्यात आलेल्या दुचाकी रॅलीला रहिवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

खारघर हे नवी मुंबईतील एक महत्त्वाचे शहर असून खाडीकिनाऱ्यालगत आहे. बेलापूर ते तळोजा गाव हा परिसर खाडीकिनारा परिसर म्हणून ओळखला जातो. खाडी भाग, तसेच समुद्रात काहीतरी संशयास्पद हालचाल दिसल्यास किंवा मदतीची आवश्यकता असल्यास आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ सागरी सुरक्षा दलासाठी १०९३ हा कोस्टल हेल्पलाइन आहे. या हेल्पलाइनची माहिती होण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी खारघर पोलिस ठाण्याच्या वतीने खारघर परिसरात दुचाकी रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत जवळपास ४०हून अधिक दुचाकी आणि निर्भया वाहनसह वाहतूक विभाग, सागररक्षक दल आणि खारघर पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

खारघरवासीयांना १०९३ या कोस्टल हेल्पलाइनची माहिती व्हावी, यासाठी रॅलीतील दुचाकींवर फलक लावण्यात आले होते. या रॅलीविषयी खारघर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दीपक सुर्वे म्हणाले, समुद्रात काहीतरी संशयास्पद दिसल्यास किंवा मदतीची आवश्यकता असल्यास सागररक्षक दलांना संपर्क साधता यावे, यासाठी १०९३ ही कोस्टल हेल्पलाइन आहे. या रॅलीत पोलिस आणि सागरी सुरक्षा दलाचे जवळपास ६०हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते.

# खारघरमधील अतिक्रमण जमीनदोस्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

खारघर सेक्टर ३५ परिसरात सिडकोच्या भूखंडावर अतिक्रमण करून सुरू असलेल्या बेकायदा चिकन, मटण विक्रेत्यांची दुकाने पालिकेने काढून टाकली. तसेच रस्ते डांबरीकरणाचे काम सुरू असल्यामुळे रहिवासी समाधान व्यक्त करीत आहेत.

खारघर परिसरात सिडकोच्या राखीव भूखंडावर अतिक्रमण करून काही चिकन, मटण विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. एका मेडिकलच्या मागे अनधिकृत मदरसा उभारण्यात आल्यामुळे वाहतूक कोंडी होत असून, रस्त्यांची दुरवस्था झाली - होती. ही समस्या दूर व्हावी, यासाठी सेक्टर ३५मधील हाइड पार्कमधील पदाधिकाऱ्यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन दिले होते. यासंदर्भात मंगळवारी (ता. १३) 'सकाळ'मध्ये 'खारघरमधील बेकायदा दुकाने हटवा' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. याची दखल घेत पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने मोकळ्या भूखंडावरील अतिक्रमण करून उभारलेली चिकन, मटण व इतर दुकाने जमीनदोस्त केली. तसेच परिसरातील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पालिकेकडून हाती घेतल्यामुळे रहिवासी समाधान व्यक्त करीत आहेत. हाइड पार्क सोसायटीचे पदाधिकारी संगीता शुक्ला म्हणाल्या, की दुकाने हटविल्यामुळे परिसर मोकळा झाला असून या भूखंडावर रोप लागवड करण्यात आली आहे. परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण सुरू व्हावे. यासाठी परेश ठाकूर, ब्रिजेश पटेल, स्थानिक कार्यकर्ते विनोद घरत यांनी सहकार्य केले.

# वीज पडून २२ शेळ्यांचा मृत्यू : अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ मदतीसाठी निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**




**मारेगावः-** तालुक्यातील नेत (वरुड) शिवारात वीज कोसळून २२ शेळ्यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.या घटनेत अल्पभूधारक शेतकरी भारत गेडाम यांचे सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले असून,अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद,यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकारी यवतमाळ यांना आज दिनांक १९ मे (सोमवार) रोजी तातडीने आर्थिक मदतीसाठी निवेदन सादर करण्यात आले आहे.घटना १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजण्याच्या सुमारास घडली.भारत गेडाम हे आपले शेळ्यांचे कळप चारण्यासाठी शिवारात गेले असता,अचानक वीज कोसळून त्यांच्या २२ शेळ्या जागीच मृत्यूमुखी पडल्या.या अपघातात ते स्वतःही जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.भारत गेडाम हे अल्पभूधारक आदिवासी शेतकरी असून,शेळीपालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय व कुटुंबाचा उपजीविकेचा आधार आहे.या घटनेने त्यांचे संपूर्ण आयुष्य आर्थिक संकटात सापडले आहे.त्यामुळे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या वतीने प्रशासनाकडे पुढील मागण्या करण्यात आल्या आहेतः

घटनेचा तात्काळ पंचनामा करून अधिकृत अहवाल तयार करण्यात यावा.

नुकसानग्रस्त शेळीपालक भारत गेडाम यांना तातडीने आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या मार्फत घटनेची तपासणी करण्यात यावी. सुरू असलेल्या उपचारांचा खर्च शासन दरबारी विनामूल्य करण्यात यावा.

"ही केवळ जनावरांची हानी नाही,तर एका मेहनती शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या अस्तित्वावरच घाला आहे,"असे मत निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने तात्काळ मदतीसाठी पुढाकार घ्यावा,अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद,यवतमाळ तालुकाध्यक्ष विद्या परचाके,लीना बोरकर,निशा वाघाडे,मंगला सोयाम,मोहिनी कुडमेथे,कॉम्रेड सचिन मनवर,प्रा. पंढरी पाठे यांनी केली आहे.

# मुंगळा फाटा.परिसरात गांजा विक्री करणाऱ्या 2. आरोपींच्या मालेगाव पोलिसांनी आवळल्या मुसक्या..

**दोन आरोपी अटकेत 2 किलो गांजा, एक मोटर सायकल 74 हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त.**

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**करण धोंगडे.**




**मालेगाव** 17. मे रोजी मालेगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने मुंगळा फाटा ते मालेगाव मेहकर रोड येथे गांजा विक्रीसाठी आलेल्या दोन इसमाविरुद्ध मोठी कारवाई केली. सायंकाळी 6. ते 8.वाजे दरम्यान ही कारवाई करण्यात आली. ही माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून खालील दोन आरोपींना रंगेहात पकडले. शेख मोहसीन शेख वय.27.वर्ष . अब्दुल फिल्म अब्दुल कयूम.वय 37. वर्ष दोघेही राहणार मेहकर. जिल्हा बुलढाणा या आरोपीकडून 2. किलो गांजा. किंमत अंदाजे.24000. एक मोटरसायकल अंदाजे किंमत.50000. असा एकूण 74000.रु किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही धडक कारवाई वाशिमचे जिल्हा पोलीस अधीक्षक. अनुज तारे. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल. यांच्या मार्गदर्शनाखाली. मालेगाव पोलीस निरीक्षक. मनोज चौधरी. यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सदर कार्यवाही. स पो नी. त्र्यंबक गायकवाड. पोलीस उपनिरीक्षक. रवी सैबे वार.पो हे का. सुनील पवार शिवाजी काळे. विजेंद्र इंगोले. जितू पाटील. गणेश मेटांगळे यांच्या पथकाने केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध. ND.PS. कायद्याच्या कलम 8.C.20. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरात गांजा सारख्या घातक पदार्थाचे प्रसार रोखण्यात पोलिसांना यश आले आहे. नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्याची माहिती पोलिसांना द्यावी. असे आवाहन मालेगाव पोलीस प्रशासनाने केले आहे.

# भगवान परशुराम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिपळूणमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

दैनिक युवक आधार
रत्नागिरी, (जिमाका) : भगवान परशुराम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिपळूणमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण इच्छुक विद्यार्थ्यांनी http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य प्रितम शेट्ये यांनी केले आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिपळुण येथे वीजतंत्री, तारतंत्री, जोडारी, कातारी, संधाता, यां. मोटार गाडी, यां. डिझेल,ओओसीपी, आयएमसीपी, एमएमसीपी हे व्यवसाय शिकविले जातात., तारतंत्री -२०, जोडारी -२०, कातारी -२०, संधाता -४०, यां. मोटारगाडी -२४, यां. डिझेल-४८, ओओसीपी -४८, आयएमसीपी-२०, एमएमसीपी -४० इतकी आहे. यामध्ये तारतंत्री व संधाता करिता शैक्षणिक पात्रता ही दहावी उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण आहे व इतर सर्व व्यवसायांकरिता दहावी उत्तीर्ण ही शैक्षणिक पात्रता आहे. तसेच व्यवसायाचा कालावधी संधाता व यां. डिझेल, या व्यवसायाकरिता १ वर्षाचा आहे व इतर सर्व व्यवसायांकरिता २ वर्षाचा कालावधी आहे. भगवान परशुराम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रमाणित कार्यपध्दतीची माहिती पुस्तिका ऑनलाईन स्वरूपात वरील संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अर्ज नोंदवून झाल्यावर उमेदवारांनी नजिकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जाऊन आपला अर्ज निश्चित करावा व त्यानंतर विकल्प सादर करावे. प्रवेश प्रक्रियेच्या विविध टप्प्यांबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये समुपदेशन करण्यात येत आहे. यामध्ये उमेदवारांना विविध व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती देण्यात येते. प्रवेशासंबंधी माहितीसाठी प्रवेश प्रक्रीया समन्वयक राजेंद्र चव्हाण – 8888070870 यांच्याशी संपर्क साधावा.

# परेशशेठ ठाकूर यांच्या पुढाकारातून रायगड जिल्हा आणि कोकणात कुस्तीला वैभव मिळणार- केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ

**पुरुष कुस्तीत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी, डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे, उपमहाराष्ट्र केसरी पै. किरण भगत**
**तर महिला कुस्तीत पै.अमेघा घरत, पै. सुष्टी भोसले ठरले किताबाचे मानकरी**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी रायगड जिल्ह्यात कुस्तीसाठी पुढाकार घेतला आहे, त्यामुळे आता रायगड जिल्हा आणि कोकणातही कुस्तीला वैभव मिळणार आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी कामोठे येथे केले.

महाराष्ट्राच्या मातीतून जन्मलेली आणि राज्याच्या परंपरेशी नाळ जुळवणारी कुस्ती केवळ खेळ नसून, शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. याच परंपरेला पुन्हा उजाळा देत पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व युवकांचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने "मा.श्री.परेशशेठ ठाकूर केसरी" भव्य कुस्ती स्पर्धा कामोठे येथील सेक्टर ६ मधील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानात लाल मातीवर व दर्जेदार आयोजनात पार पडली. या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून नामदार मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांची





उपस्थिती लाभली. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले कि,रायगड जिल्ह्यात कबड्डीपेक्षा कुस्ती कमी प्रमाणात खेळली जाते पण या स्पर्धेच्या माध्यमातून कुस्तीचा प्रचार आणि प्रसार होत आहे. परेश ठाकूर हे जिल्ह्याचे नेतृत्व करत असल्याने आता कुस्तीला चांगले दिवस येऊन या ठिकाणी खूप चांगले मल्ल घडतील, अशी अपेक्षा नामदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे बोलताना कुस्ती रसिकांची मोठी उपस्थिती व आयोजनाबद्दल भरभरून कौतुक केले. फक्त पुढच्या वर्षी जेव्हा स्पर्धा घ्याल तेव्हा यापेक्षाही मोठे मैदान बघा कारण आज हि जागा या उत्तम स्पर्धेसाठी कमी पडली आहे, अशा शब्दात त्यांनी स्पर्धेचे कौतुक केले. ट्रिपल महाराष्ट्र विजय चौधरी, महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख, डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे असे महाराष्ट्रातील नामवंत कुस्तीपटू एकाच मैदानात बघायला कमी मिळतात पण ते या स्पर्धेतून शक्य झाले आहे. त्यामुळे मनापासून मी सर्वांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या कुस्तीचा देशात नावलौकिक आहे. ऑलिम्पिक मधील पहिले पदक महाराष्ट्रातील खाशाबा जाधव यांनी कुस्तीत मिळवून दिले आणि देशाचे पहिले व्यक्तिगत स्वरूपात ते पदक होते. अशाच प्रकारे महाराष्ट्राने देशाला नामवंत खेळाडू दिले आहेत, त्यात अनेक अर्जुन पुरस्कारप्राप्त खेळाडू, भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारे अनेक खेळाडू दिले असल्याचे सांगून अशा स्पर्धांच्या माध्यमातून पुढच्या काळात परेशशेठ यांच्या नेतृत्वाखाली या रायगड कोकणातून महाराष्ट्र आणि देशाला चांगले खेळाडू मिळतील अशी अपेक्षाही नामदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त करत वाढदिवसानिमित्त माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार विक्रांत पाटील, युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, हिंद केसरी योगेश दोडके, संदीप बोंडवे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, हरचरणसिंग सग्गु, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक जयंत पगडे, अनिल भगत, गणेश कडू, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, विजय चिपळेकर, स्पर्धा संयोजक अल्पसंख्यांक आयोगाचे प्रदेश सदस्य हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पै. रुपेश पावशे, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, बळीराम पाटील, संजय भगत,योगेश लहाने, अनेश ढवळे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आतंरराष्ट्रीय दर्जाचे मैदान, उत्तम आणि दिमाखदार नियोजन, आकर्षक रोषणाई, हलगीचा ताल, मर्दानी आवाजात सूत्रसंचालन आणि हजारो कुस्ती रसिकांच्या उपस्थितीत राज्य, राष्ट्रीय दिग्गज व नामवंत कुस्तीपटूंचे मुख्य व रोमहर्षक सामने झाले. त्याचबरोबरीने स्थानिक, जिल्हा आणि महाराष्ट्रातील इतर पैलवानांची वयोगटानुसार गटनिहाय सामने मोठ्या उत्साहात झाले.

**- मुख्य स्पर्धा-**
**पुरुष कुस्ती -**
**रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध हिंद केसरी पै. सुखविंदर सिंह = पै. सिकंदर शेख विजयी**
**ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध पै. रिकार्डो अमेरिका (अमेरिका) = पै. विजय चौधरी विजयी**
**डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे विरुद्ध हिंद केसरी पै. विक्रांत कुमार = पै. शिवराज राक्षे विजयी**
**उपमहाराष्ट्र केसरी पै. किरण भगत विरुद्ध हिंद केसरी पै. हितेंद्र कुमार = पै. किरण भगत**
**महिला कुस्ती -**
**पै.अमेघा घरत विरूध्द पै. सुमन शर्मा = पै. अमेघा घरत विजयी**
**पै. सुष्टी भोसले विरूध्द पै. सोनिया तोमर = पै. सृष्टी भोसले विजयी**

# मालेगांव शहरात अतिक्रमणावर धडक कारवाई, प्रशासकीय यंत्रणा सज्ज.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**करण धोंगडे.**




**मालेगाव** : – शहरात वाढत्या अतिक्रमणा मुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, नागरिकांचा त्रास आणि शासकीय जागेचा गैरवापर याला अखेर चाप लावण्यासाठी अतिक्रमण हटविण्या साठी बुधवार पासून सुरुवात केली जात आहे. मालेगाव तहसील कार्यालयात नुकतीच एक उच्चस्तरीय बैठक पार पडली तहसीलदार तालुका दंडाधिकारी दीपक पुंडे, नगरपंचायत मुख्याधिकारी पंकज सोनुने आणि मालेगाव पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत शहरातील अतिक्रमण हटविण्या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या निर्णयानुसार बुधवारपासून मालेगाव शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेला अधिकृत सुरुवात होणार आहे. यामध्ये शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, हॉस्पिटल परिसर, बसस्टॉप व सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणांवर बुलडोझर चालवण्यात येणार आहे. संबंधित अतिक्रमण धारकांनी आपले अतिक्रमण स्वेच्छेने हटवावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे. या मोहिमेत शिव चौक, गांधी चौक, मेडिकल लाईन, अग्निहोत्री दुकान ते डॉक्टर माने हॉस्पिटल, आठवडी बाजार, बस स्टॉप परिसर, जोगदंड हॉस्पिटल मार्ग तसेच मुख्य रस्त्यावरील सर्व अनधिकृत टपऱ्या, फळ गाड्या, टपऱ्या, दुकाना समोरील सामान व बोर्ड हटविण्यात येणार आहेत यानंतर कोणीही नव्याने अतिक्रमण केल्यास त्याच्या विरुद्ध दंडात्मक कारवाई तसेच गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरातील नागरिकांनी या मोहिमेस पाठिंबा देत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**पोलिस अक्शन मोडवर....**
अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेला पोलीस बंदोबस्त पुरवण्यात येईल कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये यासाठी आम्ही सतर्क आहोत कोणतीही अडथळा आणणारी व्यक्ती किंवा गटा विरुद्ध कठोर कारवाई केली जाईल सर्वांनी सहकार्य करावे, हीच विनंती.
**पोलीस निरीक्षक संजय चौधरी.**

**नगरपंचायतने पूर्ण पाहणी व नियोजन केले आहे.**
"नगरपंचायत कडे अतिक्रमणा विरोधात वारंवार तक्रारी येत होत्या आम्ही सर्व जागांचा सर्व्हे पूर्ण केला असून, मोहिमेपूर्वी अतिक्रमण धारकाने आपले स्वतःचे अतिक्रमण काढून घ्यावे स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण काढले नाही तर आम्ही यंत्रणा लावून ती हटवू शासकीय जागेचा वापर केवळ जनतेसाठीच असतो, कोणाचाही वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे."
**मुख्याधिकारी पंकज सोनुने,**

**तहसील प्रशासन दबावाखाली येणार नाही.**
"शहरात शिस्त निर्माण होणे गरजेचे आहे सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत आम्ही यावर कठोर भूमिका घेणार असून, कुणाच्याही दबावाला न जुमानता ही मोहिम राबविण्यात येईल कोणताही अन्याय होणार नाही. मात्र अतिक्रमण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल."
**तालुका दंडाधिकारी दीपक पुंडे.**

# साकत च्या घाटात मका वाहतूक करणारा ट्रक पलटी एक जणांचा मृत्यू तर ड्रायव्हर बचावला...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**




मका वाहतूक करणारा ट्रक साकत घाटामध्ये पलटी होऊन एक जणांचा जागीच मृत्यू झाला तर ट्रक ड्रायव्हर बचावला आहे. घटनेची माहिती जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना मिळाल्याबरोबर संजय कोठारी यांनी आपली रुग्णवाहिका घेऊन सोबत दिपक भोरे, विशाल ढवळे यांना समवेत घेत घटनास्थळी दाखल झाले. तर पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, हरिभाऊ मुरूमकर, काका मुरूमकर, बाबू सुपेकर, विशाल जोगदंड, अविनाश कदम, महेश मोळकर यांच्या सह उपस्थित असणाऱ्या प्रवाशांनी मदत केली. या घटनेची अधिक माहिती अशी की रविवार दिनांक १८/०५/२०२५ रोजी सकाळी ८:०० वाजताच्या सुमारास एम.एच. १० डी.टी.- ६५२१हि दहा टायर ट्रक मका घेऊन चिखली येथून बारामती ला जात असताना जामखेड जवळील साकत च्या घाटामध्ये पलटी होण्याचा अंदाज दिसल्या बरोबर ट्रकच्या किन्नर ने उडी मारली आणि तो गाडीच्या खाली दबला गेला. तसेच ड्रायव्हर केवळ शांतीलाल चव्हाण हा या अपघातातून बाल बाल बचावला आहे. मकाच्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गाडीचे हि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उपस्थितांनी किन्नरला शोधण्याचा प्रयत्न केला असता तो मक्याच्या पोत्याखाली सापडला. लागलीच जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात त्यास दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक डॉ.मनोज शिंदे यांनी तपासणी करून मृत घोषित केले. सदर घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना दिली असता पोलीस निरीक्षक पाटील यांनी ताबडतोब जामखेड पोलीस स्टेशनचे सरोदे आणि इतर कर्मचारी पाठवून पुढील तपास चालू केला आहे.

# आष्टी तालुक्यातील दहावीच्या परीक्षेत जुळ्या बहिणींना मिळाले शेम टू शेम गुण

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**

राजे संभाजी उद्योग समूहाच्या वतीने आष्टीतील दहावीच्या परीक्षेत सेम टू सेम जुळ्या बहिणीं अनुष्का देशपांडे,तनुष्का देशपांडे यांनी ९६ टक्के गुण मिळविले व दहावीच्या परीक्षेत अलिशा पठाण हिला ९४ टक्के गुण मिळविले या तिघींनी घवघवीत यश मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उद्योजक अमोल राजे शिंदे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार जावेद पठाण,



माजी सरपंच बिबीशन भवर, संभाजी दादा कोकणे, गंगासेठ माजी सरपंच कारखेल ,आजिनाथ घुले ,निहाल पठाण,अंबादास घुले, सलीम पठाण,सुदर्शन फसले सालेवडगाव,आत्माराम आवारे,मुख्याध्यापक शेख इद्रिस सर, तुळशीराम शिंदे तुकाराम भवर बबन दादा शिंदे, शिवाजी तावरे,राजू पवळ ग्रामसेवक,शेख बब्बू गणेश कोकणे ,विकास शिंदे ,पप्पू वाळेकर आदी दिसत आहेत.

# वनोजा ते रोहणी पांदन रस्त्यावर अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांचा जीवाला धोका; प्रा.पंढरी पाठे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** (ता.राळेगाव) | दिनांक १९ मे २०२५ – वनोजा ते रोहणी हा पांदन रस्ता अतिक्रमणामुळे बंद पडल्याने परिसरातील शेतकरी अत्यंत त्रस्त झाले आहेत. हा रस्ता त्यांचा शेतीसाठी आणि दैनंदिन वापरासाठी अनिवार्य असून, त्यावर अतिक्रमण झाल्याने त्यांचे कामकाज पूर्ण ठप्प झाले आहे. शेतकरी बांधव यांसह अनेक शेतकऱ्यांनी वारंवार तहसीलदार राळेगाव यांना निवेदन दिले,परंतु तहसील स्तरावर त्यांना फक्त उडवा-उडवीची उत्तरे मिळाली. त्यांचा त्रास कमी न होता वाढतच असल्याने,कृषी अभ्यासक प्रा.पंढरी पाठे यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक १९ मे (सोमवार) रोजी यवतमाळ जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे,तहसील भू-अभिलेखाच्या नकाशानुसार वनोजा ते रोहणी हा पांदन रस्ता असून तो ४६, ४७, ४८, ७३, ७४, ९८, ९७, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८९, १० इत्यादी सन च्या कास्तकारांचा आहे.परंतु आजूबाजूचे काही कास्तकारांनी त्यावर अतिक्रमण केले असून,शेतकऱ्यांना या मार्गाने जाण्यापासून रोखले जात आहे. यावेळी शेतकऱ्यांना केवळ मनाईच नाही तर धमक्या देऊन "हातपाय तोडून टाकण्याची" देखील धमकी दिली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.दोन कास्तकारांकडून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.

प्रा.पंढरी पाठे म्हणाले,"हा प्रश्न केवळ एका रस्त्याचा नाही,तर शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहे.त्यांच्या शेतीसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे.प्रशासनाने तात्काळ याकडे लक्ष देऊन अतिक्रमण हटवावे आणि रस्ता मोकळा करावा."शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे हक्काच्या मार्गाने न्याय मिळावा,अशी तीव्र मागणी केली आहे अन्यथा सर्व शेतकरी तीव्र आमरण उपोषण करील असा शेतकर्यांनी इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी यवतमाळ कडून याबाबत सकारात्मक पाऊले उचलल्याची अपेक्षा केली जात आहे.यावेळी मनोज येणोरकर,सचिन काटेकर,हिरामण धोंगडे,पंढरी राऊत, गोपाल शेंडे,निखिल गुडधे,किसना महाजन, अशोक गुल्हाने,योगेश काटेकर,प्रा. पंढरी पाठे,इत्यादी उपस्थित होते.

# जालना- जळगाव नियोजित रेल्वे मार्गाच्या जमीन अधिग्रहणाची अधिसुचना पुढील आठवड्यात निघणार--मोबदल्याबाबत अद्याप स्पष्टता नाही

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** नियोजित जालना-जळगाव रेल्वे मार्गाच्या हालचालींना वेग येऊ लागला असून या मार्गासाठी जमीन अधिग्रहणाबाबतची अधिसूचना पुढील आठवड्यात निघणार असल्याचे महसूल प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. मागील अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या जालना जळगाव या रेल्वे मार्गाला आता कुठे मुहूर्त सापडला आहे. त्यानुसार सिल्लोड व सोयगाव तालुक्यातील १९ गावातील १९७ हेक्टर ९५ आर ४० चौरस मीटर जमीन रेल्वे मार्गासाठी संपादित करण्यात येणार आहे. सिल्लोड तालुक्यातील जमीन संपादित करण्यात येणारी गावे. भवन, वरुड, पिंपळगाव (पेठ), सिल्लोड, मंगरूळ, डोंगरगाव, पालोद, लिहा, काजीपुर, अंधारी, अनाड, उंडणगाव, बाळापुर. (अनाड जवळ अंधारी हे गाव पूर्वी होते.) सोयगाव तालुक्यातील संपादित



गावे ठाणा,फर्दापूर,धनवट, पळसखेडा, वरखेडी (बुद्रुक) वरखेडी (खुर्द) * रेल्वे मार्गाला शेतकऱ्यांचा विरोध हवाई सर्वे करून हा रेल्वे मार्ग छत्रपती संभाजी नगर जळगाव रस्त्याच्या पश्चिमेकडून घेण्यात आला असा आरोप करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) तालुका अध्यक्ष प्राध्यापक राहुल कुमार ताठे यांचे नेतृत्वाखाली शेतकऱ्यांकडून विरोध केल्या जात आहे.त्यांनी याबाबत रेल्वे प्रशासनाला पत्र दिले आहे. यापूर्वी हा रेल्वे मार्ग या मुख्य रस्त्याच्या पूर्वेकडून होता असे या पत्रात नमूद करून आता पश्चिमेकडून मार्ग घेत असल्याने अनेक शेतकऱ्यांचे व नागरिकांचे जमिनी व घरे मोठ्या प्रमाणात बाधित होऊन नुकसान होत असल्याचे नमूद करून त्यांनी या रेल्वे मार्गास विरोध दर्शविला आहे. *मोबदल्याबाबत अद्याप स्पष्टता नाही या रेल्वे मार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींचा जमीन मालकांना किती मोबदला मिळेल याबाबत अद्याप प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले नाही. सह-दुय्यम निबंधक कार्यालयाच्या व नगर विकास विभागाच्या अहवालानंतर रेडी रेकनर नुसार मोबदला ठरविला जाणार आहे.

सिल्लोड शहराजवळील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी यापूर्वी शासनाने विविध योजनांसाठी संपादित केल्या असून थोड्याफार राहिलेल्या जमिनीवर आपला उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पोटावर मारण्याचा हा शासनाचा प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नाही रेल्वे विभागाच्या वतीने शहराच्या पूर्वेकडून करण्यात आलेल्या सर्वेनुसार मार्ग व्हावा अशी आमची मागणी आहे
**प्रा.राहुल कुमार ताठे**
**तालुकाध्यक्ष सिल्लोड**
**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)**

# वाशिम च्या श्रावणी गोमाशे ची दिशादर्शक कामगिरी

## कठीण परिस्थितीवर मात करून मिळवलं घवघवीत यश.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम च्या द वर्ल्ड स्कुल ची विद्यार्थिनी श्रावणी गोमाशे ही सीबीएसइ बोर्डातून दहावीच्या परीक्षेत 89.6 टक्के गुणांसह उत्तीर्ण झाली आहे.लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार अनेक बातम्या देत असतात समाजातील वेदना समस्या प्रश्न इत्यादींवर ते आपल्या बातमी च्या माध्यमातून सतत आवाज उठवत असतात अशात पत्रकारांच्या घरात देखील अनेक गौरवाच्या संघर्षाच्या घटना घडतात मात्र त्याची कधीही बातमी होत नाही याच प्रकारे वाशिम जिल्ह्यातील पत्रकार किशोर गोमाशे ज्यांची कन्या श्रावणी गोमाशे हिने अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करत सीबीएससी बोर्डात 89.60 टक्के गुण घेऊन घवघवीत यश मिळवले आहे श्रावणी गोमाशे चे वडील किशोर गोमाशे जिल्ह्यातील प्रामाणिक पत्रकार आहेत फेब्रुवारी महिन्यात बातमी करण्यासाठी गेले असता त्यांचा भीषण अपघात झाला होता या अपघातात त्यांच्या पायावर विविध शस्त्रक्रिया कराव्या लागल्या याच काळात श्रावणी दहाव्या वर्गात होतीगोमाशे परिवारासाठी हा काळ अत्यंत कठीण होता तरी श्रावणी हरली नाही तिने आपला प्रवास सुरू ठेवला या धक्क्यातून हा परिवार सावरत नाही तेवढ्यात किशोर गोमाशे यांचे वडील श्रावणीचे आजोबा यांचं निधन झालं तरीसुद्धा तिने हिम्मत न हरता सतत अभ्यास सुरू ठेवला महत्त्वाचे म्हणजे तिला ट्युशन नव्हतं कोचिंग नव्हती स्वतःच्या बळावर तिने हे यश मिळवले आहे तिला मिळालेलं यश हे असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारे आहे. गुणी माझी लेक...हे वाक्य माझी थोरली कन्या श्रावणी गोमाशे साठी तंतोतंत लागू पडते.प्रचंड जिद्द आणि चिकाटी असणारी तसेच कोणत्याही प्रसंगाला धीरोदात्तपणे सामोरे जाणारी आहे माझी श्रावणी... प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील शिक्षणाची पहिली




पायरी म्हणजे इयत्ता 10 वी...श्रावणी चं ही 24 - 25 हे दहावीचं वर्ष.. प्रत्येक विद्यार्थ्याला 10 वी मुळं कमी अधिकप्रमाणात टेन्शन येतच. त्याला श्रावणी ही अपवाद नव्हती. त्यातच गत वर्षी 21 फेब्रुवारी ला माझा भीषण अपघात झाल्यानं एक मोठा कठीण प्रसंग आमच्या सर्व परिवारावर आला.त्याचा प्रचंड त्रास श्रावणी ला सहन करावा लागला. तिने या ही प्रसंगाचा सामना केला. यातून कसं बसं आम्ही सावरत नाही तोच श्रावणी च्या दहावी च्या परिक्षे आगोदर काही दिवस माझे वडील सहदेवराव गोमाशे यांचं अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं.याचा प्रचंड धक्का आमच्या कुटुंबाला बसला. त्यात श्रावणी ही आमच्या वडिलांची आज्ञार्थी आणि प्रामाणिक नात.तिचं आणि आमच्या वडिलांचं ( अण्णा ) एक घट्ट नातं होतं.त्यातच अण्णा निघून गेल्यानं ती ही दुःखाच्या खाईत ढकलल्या गेली.

या दुःखद प्रसंगात ही श्रावणी डगमगली नाही.तिने मोठ्या हिमतीनं दुःख पचवत दहावीचा अभ्यास नेटानं केला.तिला 10 वी मध्ये कोणतीही ट्युशन किंवा कोचिंग नव्हती ती फक्त द वर्ल्ड स्कुल च्या प्रिन्सिपल भावना सुतवणे मॅडम आणि उप प्राचार्य मनोज सुतवणे सर आणि त्यांच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनात दहावीचा अभ्यास करत होती. याच मार्गदर्शनामुळं आणि तिच्या परिश्रमानं CBSE बोर्डाच्या दहावी मध्ये मध्ये 90 टक्के गुण मिळविले.

## तेजश्री पाटील चे एसएससीत सुयश ; ९३.४०% मिळून उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**



**पारोळा -** येथील श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ संचलित सौ एम यू इंग्लिश मीडियम स्कूल ची विद्यार्थिनी तेजश्री प्रकाश पाटील हीने दहावीचा (SSC) परीक्षेत ९३.४० टक्के गुण संपादन करून उत्तीर्ण झाली.जिद्द चिकाटी व मेहनतीच्या जोरावर आणि शिक्षकांचा मार्गदर्शनामुळे तेजश्री ने हे यश मिळवले.या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.तेजश्री ही पत्रकार प्रकाश पाटील यांची मुलगी आहे.

## महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज);** छत्रपती संभाजी राजे यांच्या महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याकडे मुंबई,रायगड,ठाणे व पालघर जिल्ह्यातील संघटनात्मक जबाबदारी सोपवण्यात आली आहे.पक्षाचे उपाध्यक्ष अंकुश बाबा कदम,सरचिटणीस धनंजय जाधव यांच्या स्वाक्षरीने पक्षाच्या मुंबई विभाग युवक अध्यक्षपदी संतोष कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# स्वयंघोषित शिक्षण महर्षी बनण्याच्या अट्टाहासामुळे अनधिकृत शाळांचे पेव फुटले

## अनधिकृत शाळा चालवतात कशी ; गटशिक्षणाधिकारी करतात तरी काय...

**दैनिक युवक आधार**
**खालापूरः-वार्ताहर**

रायगड जिल्हा शैक्षणिक हब बनण्याच्या दिशेने वाटचाल करताना दिसत असलातरी स्वयंघोषित शिक्षण महर्षी बनण्याच्या अट्टाहासामुळे अनधिकृत शाळांचे पेव फुटले आहेत. काही तालुक्यात अनधिकृत शाळांची यादी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागाने जाहीर केली खरी, परंतु ठोस कारवाई नसल्याने आमचे कोण काय बिघडवतो या अविर्भावात अनेकांनी विद्या मंदिराची पावित्र्यता न पाळता बेकायदेशीर शाळा बिनदास पणे सुरूच ठेवलेल्या दिसत आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात टाकत, पालकांची फसवणूक करत ,शाळा अनधिकृत पद्धतीने शासनमान्यता न घेता, कागदपत्रांची पूर्तता न करता चालवल्या जात असल्याने आपणच आपल्या पाल्याला असुरक्षित करत आहोत. स्वयंघोषित संस्था चालक , शिक्षक इतर कर्मचारी यांची चारित्र्य




पडताळणी नसल्याने नकळतपणे आपणच आपल्या मुलांचा जीव धोक्यात तर टाकत नाही ना अश्या अनेक चिंता पालकांना अस्वस्थ करत राहतील. नियम-निकषांची पूर्तता नसतानाही शाळा फक्त धंदा,व्यवसाय म्हणून करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या बालमनावर काय परिणाम होईल या कडे मात्र शिक्षण विभागाचे दुर्लक्ष असणे म्हणजे विद्यार्थ्यांचे लैंगिक शोषण विनयभंग असे विविध अत्याचाराचे अनुचित प्रकार भविष्यात घडल्यास त्याला जवाबदार कोण असेल असा प्रश्न समाजा पुढे सातत्याने येत आहे शैक्षणिक नियमांचे उल्लंघन,बेकायदेशीर संस्था असणे ,शिक्षणाची गुणवत्ता नसणे ,कौशल्य विकास व शिक्षण नसणे ,अतिक्रमण जागा असणे,बालकामगार कायदा मोडणे,चारित्र्य पडताळणी नसणे अश्या विविध महत्वपूर्ण कायद्या अंतर्गत कठोर व अजामीनपात्र गुन्हे दाखल व्हावे यासाठी शिक्षण विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था,पोलीस प्रशासनाने कठोर पावले न उचलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. .दि.०८ मे २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय खालापूर गटशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयातून खोपोली नगरपालिका हद्दीत असलेल्या सनशाइन इंटरनॅशनल स्कूल वर कायदेशीर नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यामध्ये शाळेची मान्यता नसल्याचे तसेच खोपोली नगरपरिषद विभागाची मान्यता नसल्याचे कागदपत्र सादर न केल्याने शाळा सुरू ठेवू नये ,ती शाळा तात्काळ बंद करण्यात यावी अन्यथा शाळा व्यवस्थापनास रुपये ०१ लाख इतका दंड करण्याचे शासनाचे आदेश असेल व बंद न केल्यास १० हजार प्रतिदिन इतका दंड ठोठावण्याबाबतचा त्या नोटीस कारवाई पत्रामध्ये म्हटले आहे.पण अजून सुद्धा अनधिकृत शाळेवर शिक्षण विभागाकडून कुठल्याही प्रकारची कसलीही दंड वसुली किंवा कायदेशीर कठोर कारवाई झाली नसल्याने शिक्षण विभागावर अनेक प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. खालापूर तालुक्यातील शिक्षण विभागाने दंड वसूली,शाळा बंदी तसेच संस्था चालक , मुख्याध्यापक ,कार्यकारी मंडळाची कार्यवाही मात्र गुलदस्त्यात आहे . अश्यावर विद्यार्थी, पालक व नागरिकां समोर चिंताजनक अनेक प्रश्न व चिंता निर्माण होत आहे .या सर्व असंविधानिक,कायदेशीर बाबींवर अंकुश न निर्माण झाल्यास बदलापूर शाळे सारखी अमानवी निंदनीय घटना घडण्यासाठी आपण सर्व समाजातील जबाबदार नागरिक असू अशी संवेदनशील मनाची भावना व्यक्त होताना दिसणे चिंतेचा विषय बनली आहे.

# शेलार भावकी द्वितीय वर्धापन दिन सोहळा तसेच श्री सत्यनारायण महापुजा आणि कुळाचार जागरण गोंधळ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रायगड,(केतन भोज);** शेलार भावकी वर्धापन दिन सोहळा यांच्या संयुक्त विद्यमाने मु.पोस्ट.तळेगाव,ता.तळा,जिल्हा रायगड यांच्या शेलार भावकी बंधूंच्या वतीने या वर्षी द्वितीय वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दि.१७ मे २०२५ रोजी सामुहिक कुलदैवत/ग्रामदैवत पूजन आणि सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.तसेच दि.१८ मे २०२५ रोजी शेलार भावकी कुळाचार जागरण गोंधळ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या शुभ प्रसंगी शेलार भावकी बंधूंच्या वतीने गतवर्षी प्रमाणे सामाजिक,शैक्षणिक,क्रिडा,क्षेत्रात दैदिप्यमान कार्य केलेल्या व्यक्तिंना सन्मानित करण्यात आले.मुलांमध्ये शिक्षणाची रुची निर्माण होऊन ते आपल्या भावी आयुष्यात यशस्वी व्हावीत त्याकरता प्रोत्साहन म्हणून त्यांचा यथोचित यावेळी गुण-गौरव करणे आणि क्रिडा क्षेत्रातही त्यांना विशेष नेपुण्य मिळावे,तसेच सामाजिक क्षेत्रातही सामाजिक सेवा करणाऱ्या व्यक्तीस प्रोत्साहन देणे हा त्यांचा एकमेव उद्देश आहे.यावेळी दि.१७ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कुलदैवत/ग्रामदैवत यांचे पूजन करून त्यानंतर ११ वाजेपर्यंत सर्व ग्रामदेवींची ओटी भरणे कार्यक्रम करण्यात आला.गावातील सर्वच ग्रामदेवता यांची वाजत गाजत मिरवणूक काढत ओटी भरणे हा कार्यक्रम गेल्यावर्षी पहिल्यांदाच शेलार भावकीकडून करण्यात आला होता.आणि पुढे ही ते कायम स्वरूपी सर्वच स्थरातील लोकांनी चालू ठेवले आहे. यावेळी महिला/पुरुष तसेच लहान थोर मंडळी यांची उपस्थिती वाखण्याजोगी होती. त्यानंतर दुपारी ११ ते ०१ वाजेपर्यंत श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली.तद्नंतर दुपारी ०३ ते ०५ वाजे दरम्यान महिलांसाठी हळदी कुंकू सभारंभ आयोजित करण्यात आला.तसेच सायंकाळी ०५ ते ०७ वाजेपर्यंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि सामाजिक सेवा करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडला.विद्यार्थी गुणगौरव सोहळा निमित्त विद्यार्थी यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले तसेच मान्यवरांचे शाळ व श्रीफळ देऊन त्यांचा सुद्धा यावेळी यशोचित सन्मान करण्यात आला.पुढे रात्री ७ ते १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.आणि शेवटी पुढे रात्री १० नंतर सांस्कृतिक कार्यक्रम व प्रासादिक भजन आयोजित करण्यात आले होते.त्याच बरोबर प्रा.सुनील देवरे,नागोठणे व्याख्याते-वारकरी विचार मंच रायगड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि शेलार मामांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीला कसे मार्गदर्शक आहेत.तसेच शेलार भावकीने एकजुटीने कसे रहावे.नातीगोती कशी जपावी भावी पिढी साठी संस्कार,शिक्षण,आरोग्य,रोजगार यासाठी कसे कार्य करावे भावकीची एकी कशी अबाधित ठेवावी याचे अनमोल मार्गदर्शन केले.तसेच दुसऱ्या दिवशी दि.१८ मे २०२५ रोजी सकाळी ०९ वाजता शेलार भावकी कुळाचार जागरण गोंधळ कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडण्यासाठी कार्यकारणी मंडळ समिती अध्यक्ष- श्री. दिनेश हरीशचंद्र शेलार,





उपाध्यक्ष- दत्ताराम रमेश शेलार,मनोज वसंत शेलार,सचिव-महेश लक्ष्मण शेलार, कुंदन लक्ष्मण शेलार,खजिनदार-गणेश पांडुरंग शेलार,सल्लागार-रोहिदास बाबु शेलार तसेच कार्यकारणी मंडळी गोपाळ शेलार,दिनेश शेलार,परशुराम शेलार,दिलीप शेलार,लक्ष्मण शेलार,धोंडू शेलार,संतोष लक्ष्मण शेलार तसेच सर्वच सदस्य मंडळी महिला व पुरुष यांनी कठोर परिश्रम घेतले.

# सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने मिळवले दहावी मध्ये तब्बल ९३.२०% टक्के

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

जिद्द मेहनत व सचोटी ने केलेले प्रयत्न कायम यश मिळवून देतात याचे ताजे उदाहरण म्हणजे सद्गुरू वामनबाबा हायस्कूल शाळेची (घोट ) गावातील कु. प्रणाली दत्तात्रेय हजारे या मुलीने इयत्ता दहावीच्या परीक्षेत तब्बल 93.20% टक्के गुण मिळवून स्वतःचे तसेच गावचे नाव रोशन केले आहे सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेली प्रणाली चे वडील श्री दत्तात्रेय हजारे व आई सौ सुरेखा हजारे हे घोटगावात एक छोटेसे हॉटेल चालवत असून त्याच हॉटेल च्या व्यवसायवर त्यांचे घर चालते त्या हॉटेल कामासाठी सुध्दा कु.प्रणाली ही आपल्या आई वडिलांना मदत करते.अगदी बालपणापासूनच शाळेमध्ये अभ्यासात हुशार असलेली प्रणाली हिची मेहनत नेहमी फळाला येते हे तू पुन्हा एकदा दाखवून दाखवलंस या वाक्या प्रमाणे या यशा बद्दल कु प्रणाली वर गावातून तसेच परिसरातून व नातेवाईकयांच्या कडून कौतुकाचा वर्षाव होत असून या बद्दल पुढील काळात तिला यूपीएससी परीक्षेत यशस्वी होऊन शासकीय नोकरीत रुजू व्हावे असे तिचे स्वप्न आहे या यशासाठी तुझे खूप खूप अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचाली साठी





MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE
SSC EXAMINATION FEBRUARY 2025 RESULT

| | |
|---|---|
| Name: | HAJARE PRANALI DATTATREY |
| Mother: | SUREKHA |
| Seat No: | A197608 |
| Division: | Mumbai |

| Subject Code | Subject Name | Marks |
|---|---|---|
| 01 | MARATHI (1ST LANG) | 090 |
| 15 | HINDI (2/3 LANG) | 082 |
| 17 | ENGLISH (2/3 LANG) | 090 |
| 71 | MATHEMATICS | 093 |
| 72 | SCIENCE & TECHNOLOGY | 094 |
| 73 | SOCIAL SCIENCES | 096 |
| TOTAL | | $ 463 + 03 / 500 |
| PERCENTAGE | | £ 093.20 |
| RESULT : PASS | | |


£ - Indicates total marks and Percentage calculated on "Best 5 Criteria".

# २ पैकी १ निरोगी भारतीयामध्ये हृदयरोगाची सुरुवातीची लक्षणे आढळतात

## जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त अपोलोने देशाला 'नॉर्मल' बाबत पुनर्विचार करण्याचे आवाहन केले

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर**

: जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त, अपोलो हॉस्पिटल्सने भारतातील उच्च रक्तदाबाच्या वाढत्या प्रमाणाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. भारतातील सुमारे ३०% प्रौढ लोकसंख्येला उच्च रक्तदाबाचा त्रास आहे. उच्च रक्तदाब हे हृदयरोग, स्ट्रोक, मूत्रपिंड निकामी होणे आणि अकाली मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्यावर त्याचा भार खूप जास्त आहे. असे असूनही, उच्च रक्तदाबाने ग्रस्त बहुसंख्य लोकांचे निदानच झालेले नाही. ही वास्तविकता देशभरातील आरोग्यसेवेच्या प्राधान्यक्रमांमध्ये बदल करण्याची तातडीची गरज अधोरेखित करते. भारतात उच्च रक्तदाबाचा वाढता भार अलिकडच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, अंदाजे ३० कोटी लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, उच्च रक्तदाब असलेल्या जवळजवळ अर्ध्या लोकांना त्यांच्या स्थितीची माहितीच नसते. तरुण लोकसंख्येमध्ये याचा प्रसार लक्षणीयरीत्या जास्त आहे, २०२४ मध्ये ४५ वर्षांखालील २६% लोकांना उच्च रक्तदाबाचे निदान झाले होते. भारताच्या आरोग्यसेवेवरील दबाव वाढत आहे. हैदराबाद (६८%), दिल्ली (६५%) आणि चेन्नई (६३%) मध्ये सर्वाधिक प्रसार नोंदवला गेला. 'शहरी जीवनशैली' चे दुष्परिणाम यामध्ये स्पष्टपणे दिसून येतात, दीर्घकालीन ताणतणाव आणि बैठी जीवनशैलीमुळे हृदयरोगाचा धोका वाढतो.डॉ.प्रताप सी रेड्डी, संस्थापक-अध्यक्ष, अपोलो हॉस्पिटल्स म्हणाले,"भारताने अनेक सार्वजनिक आरोग्य संकटांवर यशस्वीरित्या मात केली आहे आणि हे यश जागरूकता आणि सामूहिक प्रयत्नांमुळे मिळाले आहे. अपोलो हॉस्पिटल्समध्ये, आम्हाला असे वाटते की आजारांना प्रतिबंधक घालणे हा पहिला उपाय आहे. अपोलो प्रोहेल्थ सारख्या उपक्रमांद्वारे, आम्ही २५ दशलक्षाहून अधिक स्क्रीनिंग्सचे प्रभावी कृतीत रूपांतर करत आहोत - डिजिटल हायपरटेन्शन मॉनिटरिंग वाढवणे, धोरणात्मक समर्थन मजबूत करणे आणि नियमित स्क्रीनिंगला संपूर्ण देशभरात प्राधान्य देणे. प्रत्येक भारतीयाला निरोगी आणि दीर्घ आयुष्य लाभावे ही आमची सदिच्छा आहे." प्रतिबंधाचा मार्गः वैयक्तिक आणि तंत्रज्ञान सक्षम - मिठाचे सेवन कमी करणे, शारीरिक हालचाली वाढवणे आणि ताणतणावाचे व्यवस्थापन करणे यासारखे साधे बदल जीवनशैलीमध्ये घडवून आणून उच्च रक्तदाबामुळे होणारे ८०% हृदयविकाराचे झटके आणि स्ट्रोक टाळता येऊ शकतात, असे पुरावे दर्शवतात. उच्च रक्तदाबावर वैद्यकीय उपचार आवश्यक असले तरी, अपोलो हॉस्पिटल्स प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देत आहे. उच्च रक्तदाबाचा वाढता भार कमी करण्याची गुरुकिल्ली म्हणजे नियमित तपासणी, निरोगी जीवनशैली निवडी आणि गंभीर गुंतागुंत होण्यापूर्वी जोखीम घटकांवर उपाययोजना करून व्यक्तींना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करणे ही आहे. अपोलो हॉस्पिटल्स उच्च रक्तदाबाचे निदान आणि उपचार वाढविण्यासाठी देशातील आरोग्य सेवा प्रणालींमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा प्रयत्न करत असते. एआय, प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स आणि टेलिमेडिसिनमधील प्रगती आरोग्यसेवा पुरवण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणत आहे, ज्यामुळे अधिक अचूक जोखीम मूल्यांकन, लवकर ओळख आणि उच्च रक्तदाबाचे सक्रिय व्यवस्थापन शक्य होत आहे. अपोलोने हृदयरोग प्रतिबंधावर संपूर्ण देशाने पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे, भारतीयांना शक्य तितक्या लवकर शारीरिक तपासणी सुरू करण्यास सांगितले आहे, विशेषतः 30 वर्षांनंतर किंवा हृदयरोगाचा कुटुंबातील इतिहास असलेल्यांसाठी. कोरोनरी कॅल्शियम स्कोअरिंगसारख्या प्रगत इमेजिंग तंत्रांचा समावेश केल्याने छुपे धोके समजण्यास मदत होऊ शकते. लक्षणे दिसत नसतानाही, सुरुवातीच्या लक्षणांना समजून घेऊन प्रतिबंधात्मक उपचार पद्धतींचा अवलंब केल्याने भविष्यातील गुंतागुंत मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की जेव्हा एथेरोस्क्लेरोसिस सुरुवातीच्या टप्प्यात असलेल्या व्यक्तींना मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित उपचार मिळतात तेव्हा हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटनांमध्ये ४५-५०% घट होते.




## मुंबई वरुन देवरुख ला अंत्यविधी साठी जाणाऱ्या कुटुंबावर कालाचा घाला अपघातात पाच जणांनाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी= योगेश सुतार**

दि १८ मे रोजी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर भरणा नाका येथे जगबुडी नदीच्या पुलावरून कार सुमारे १०० फूट खोल नदीत कोसळून अपघात झाला. या अपघातात पाच जणांननचा मृत्यू झाला आहे. मुंबई हुन देवरुख ला अंत्यविधी साठी जात असताना हा अपघात झाला. या घटनेत कारचालक गंभीर जखमी झाला आहे. तर पाच जणांना नचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना पहाटे पाच ते साडे पाच च्या सुमारास घडली. यामध्ये मेघा परमेश पराडकर सौरभ परमेश पराडकर ( २२) मिताली विवेक मोरे वय वर्षे ( ४५) निहार विवेक मोरे (१९) श्रेयश राजेंद्र सावंत वय वर्षे (२३) या पाच जनानचा दुर्दैवी मृत्यू झाला असून यामध्ये दोन कुटुंबातील व्यक्तींचा समावेश आहे. हे सर्व जण मुंबई हुन देवरुख ला अंत्यविधी साठी निघाले असताना त्याच्या वर काळाने घाला घातला. दोन्ही कुटुंब मुंबई मिरा रोड भाईंदर येथुन रात्री साडेअकराच्या सुमारास देवरुख येथे जाण्यासाठी निघाले होते. आपल्या ताब्यातील किया कारणे निघाले होते. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग भरणे नाका येथे आले असता जगबुडी वरील मोठ्या ब्रीजवरुन ही कार थेट नदी पात्रता कोसळी ही घटना पहाटे पाच ते साडेपाच च्या दरम्यान घडली. स्थानिक नागरिकांना याची माहिती मिळताच नागरिकासह पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जखमिना बाहेर काढून कंळबणी देथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या परमेश पराडकर यांना पुढील उपचारासाठी रत्नागिरी येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे . तर विवेक मोरे हे गंभीर जखमी झाले असून त्याना खेड येतुन पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. किया कार (MH023662) ही कार घेऊन मीरा रोड येतुन गावी निघाले होते. तर मोरे मीरा भाईंदर येथील आहेत. घटनास्थळी खेड चे माजी नगराध्यक्ष वैभव जी खेडेकर खेड पोलीस महामार्ग पोलीस व नागरिकांनच्या मदतीने जखमी ना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी दाखल करण्यात आले व क्रेनच्या साह्याने कार बाहेर काढण्यात आली आहे. या अपघाताची नोंद करण्याची कार्यवाही खेड पोलीस करत आहेत.

## जय भवानी एज्युकेशन सोसायटी संचलित सुमन विद्यालय, टेरव या प्रशालेचा मार्च २०२५ चा निकाल १००%

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

जय भवानी एज्युकेशन सोसायटी संचलित सुमन विद्यालय, टेरव प्रशालेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस. एस. सी.) परीक्षा मार्च २०२५ चा निकाल प्रतिवर्षाप्रमाणे १००% लागला असून, विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत विद्यालयाचा गौरव वाढविला आहे. या परीक्षेत कु. आदित्य गोपीचंद कदम याने ९२.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सिद्धी अनंत कदम हिने ९२.४०% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कुमार समर्थ सुदेश साळवी याने ९१.६०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

सदर निकालामध्ये प्रशालेमधून एकूण ३१ विद्यार्थ्यांपैकी विशेष प्रावीण्य श्रेणीत १२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीत ५ विद्यार्थी यांनी नेत्रदीपक यश मिळवले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे जय भवानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. विकासराव कदम, सचिव श्री. योगेशराव कदम, खजिनदार श्री. अजितराव कदम, तसेच संस्थेचे सर्व संचालक, सभासद, ग्रामस्थ, हितचिंतक व पालक यांच्या वतीने अभिनंदनचा वर्षाव करण्यात येत आहे.


. आदित्य गोपीचंद कदम
प्रथम क्रमांक
९२.८०%


कु. सिध्दी अनंत कदम
द्वितीय क्रमांक
९२.४०%


कु. समर्थ सुदेश साळवी
तृतीय क्रमांक
९१.६०%

## दिव्यांगाना जगण्याची हिम्मत देते मधु तारा.मोफत कृत्रिम पाय.मधु तारा प्रत्येकाची माय.

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी संतोष लांडे पुणे जिल्हा

आपल्या आई वडिलांच्या नावाने मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन अवघ्या काही वर्षात राज्यातील अनेक दिव्यांगांसाठी जगण्याची हिम्मत बनत आहे.


पारनेर.जिल्हा अहिल्यानगर येथील रोहिणी बोटे या तरुणीला रेल्वे अपघातात आपला उजवा पाय गमवावा लागला.सोशल मीडियावरून मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांना संपर्क साधून मोफत पाय बसवून मिळावा या साठी रोहिणीने विनंती केली.

अवघ्या काही दिवसात मधु तारा प्रमुखांनी साधू वासवानी मिशन पुणे यांच्या माध्यमातून रोहिणी बोटे या तरुणीला मोफत कृत्रिम पाय बसवण्यात आला.

या साठी मधु तारा सोबती साधु वासवानी मिशन टेक्निशियन श्री ज्ञानेश्वरजी पाटील सर आणि संपूर्ण टीमचे तसेच मधु तारा प्रमुखांचे आभार रोहिणी व बोटे कुटुंबीयांनी मानले.

या वेळी संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांगासाठी मधु तारा ही जीवन पर्वणीच ठरली आहे.असे बोटे परिवाराच्या वतीने आभार व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.





आमचे मित्र पत्रकार समीर शेख यांची भाची महेक खमर सय्यद व शेख अल्ताफ यांच्या शुभविवाह प्रसंगी उपस्थित राहून वधू वरांना शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सरपंच दत्तात्रय खोटे,हभप अशोक महाराज काकडे,हभप विजय राजपुरे महाराज,माजी सरपंच विठ्ठल राख, जेष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल,खमर सय्यद, पत्रकार संतोष नागरगोजे,अक्षय विधाते, मारुती संत्रे, शेख महेशर, शिक्षक राजेंद्र लाड, शिक्षक रामकिसन गिते आदी दिसत आहेत.*
( छायाचित्र दैनिक युवक आधार )

## १९ वर्षीय तरुणीचा विनयभंग, आरोपी विरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** घरात घुसून एका १९ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याने एकावर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना आसडी गावात घडली आहे. पीडित तरुणी घरात एकटी असताना मागच्या दरवाजातून आरोपी घरात शिरला. त्याने तिचे दोन्ही हात पकडून विनयभंग केला. पीडितेने आरडाओरड केली असता आरोपीने जर ओरडलीस तर तुला मारून टाकीन, अशी धमकी दिली. या प्रकरणी विठ्ठल गवळी (रा.आसडी) याच्याविरोधात सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल सचिन काळे करत आहेत.

# घाटंजी शहराच्या सौंदर्यात भर! डिजिटल नामफलकांचे शानदार अनावरण! आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते अनावरण !

दैनिक युवक आधार
घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)

'घाटंजी माझा अभिमान माझा स्वाभिमान' आणि 'आय लव्ह कॉटन सिटी' यांसारख्या आकर्षक डिजिटल नामफलकांनी आता घाटंजी शहराची ओळख अधिक सुंदर आणि प्रभावी होणार आहे! नुकतेच लोकप्रिय आमदार मा. प्रा. श्री. राजुभाऊ तोडसाम यांच्या अध्यक्षतेखाली या डिजिटल नामफलकांचे शानदार अनावरण कृषी उत्पन्न बाजार समिती घाटी (कापूस यार्ड) आणि शिव मंदिर (खापरी नाका) येथे उत्साहात संपन्न झाले. शहराचे सौंदर्य वाढवण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आमदार श्री. राजुभाऊ तोडसाम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी श्री. राजू घोडके यांनी शहरात अनेक विकासकामे प्रस्तावित केली असून, लवकरच घाटंजीचा चेहरामोहरा बदलणार आहे. मोठे रस्ते, नाली बांधकाम, शौचालय सुविधा, आठवडी बाजार परिसराचा विकास आणि विविध ठिकाणी वृक्षारोपण यांसारख्या कामांना वेग आला आहे. याच विकासकामांमध्ये आता खापरी नाका आणि कृषी उत्पन्न बाजार समिती घाटी येथे आकर्षक डिजिटल बोर्डांची भर पडली आहे. मुख्याधिकारी श्री. राजू घोडके यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे डिजिटल फलक शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर घालणार आहेत. याप्रसंगी बोलताना मुख्याधिकारी श्री. राजू घोडके यांनी घाटंजी शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. आमदार मा. श्री. राजू तोडसाम यांच्या हस्ते फीत कापून या नामफलकांचे अनावरण करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात आमदार महोदयांनी गेल्या दहा वर्षांत शहरात झालेल्या मोठ्या बदलांचा उल्लेख केला आणि आगामी काळात शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून घाटंजीचा नावलौकिक वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमाला भाजपा तालुकाध्यक्ष विजयसिंह बैस, शहराध्यक्ष गजानन ढवळे, माजी नगराध्यक्ष राम खांडरे, सामाजिक कार्यकर्ते महेश पवार, सतीशभाऊ मलकापूरे, आकाश मारावार यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगर परिषदचे अधीक्षक राम अनुसे, बां.अ.रॉजर नारणकर, पा.पु.अ. ज्ञानेश्वर घरडे, लेखापरीक्षक वावरे सर व इतर कर्मचाऱ्यांनीही या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोलू फुसे, अमोल पेटेवार, अमित प्रधान आणि अक्षय वातीले यांनी विशेष परिश्रम घेतले.एकंदरीत, घाटंजी शहराच्या सौंदर्यात भर घालणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे आणि यामुळे शहराची एक नवीन ओळख निर्माण होईल यात शंका नाही!

